# प्रकरण चौथे

## दृष्टांतपाठातील सामाजिक परिस्थिती

# प्रकरण चौथे

## दृष्टांतपाठातील सामाजिक परिस्थिती

मागील प्रकरणात स्मृतिस्थळातील समाज जीवनाचा विचार केला. स्मृतिस्थळ हा ग्रंथ महानुभाव संप्रदायातील व्यक्ती व घटना यांच्याशी संबंधित आहे. महत्त्वाच्या व्यक्तींचे जीवनचित्रण त्यातून आपणांपुढे येते. व्यक्ति जीवन हे समाज सापेक्षा असल्याने सामाजिक जीवनाचे चित्रणही त्यातून सुस्पष्ट झाले. ठराविक काळ, महत्त्वाच्या व्यक्ती व नेमकेस्थळ यामुळे या सर्व लेखनात ऐतिहासिक सत्यता निर्माण झाली आहे. हे सर्व चित्रण आठवणींच्या स्वरूपातून रेखाटले गेलेले असल्याने, त्याला स्मृती म्हणून संबोधले गेले.

या प्रकरणात दृष्टांतपाठातील समाज जीवनाचा विचार करावयाचा आहे. महानुभाव वाङ्मयात जे तत्त्वचिंतनपर ग्रंथ निर्माण झाले त्यात दृष्टांतपाठाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्राचीन काळी कुठलेही तत्त्व-ज्ञान दुसऱ्याप्रत पोहचवावे किंवा ते सर्वसामान्य जनतेला सहजतेने समजावे. यादृष्टीने असे तात्त्विक असे तात्त्विक विचार कथेच्या माध्यमातून सांगितले जात असत. दृष्टांतपाठातही असेच स्वरूप आपणांस आढळते. त्यामुळे या ग्रंथाच्या लेखनाला नकळत एकप्रकारची अलौकिकता प्राप्त झाली आहे. यासाठी या ग्रंथाचे काही वेगळे विशेष आपणांस लक्षात घ्यावे लागतात.

### १) दृष्टांतपाठ: एक श्रुतिग्रंथ:

"स्मृतिस्थळ" हा ग्रंथ जसा स्मृतींच्या रेखाटनातून निर्माण झाला आहे. त्याप्रमाणे दृष्टांतपाठ हा ग्रंथ एक श्रुतिग्रंथ म्हणून निर्माण झालेला आहे. माहिंमभटाने श्री चक्रधरस्वामींच्या लीळा गोळा करून, संकलीन करून "लीळाचरित्र" हा महान ग्रंथ निर्माण केला. या "लीळाचरित्रात" स्वामींची जी वचने आलेली

आहेत. ती वेगळी काढून त्यांचे "सूत्रपाठ" या नावाने केशिराजांनी संपादन केले. महानुभावपंथ चक्रधरांना परमेश्वरावतार मानीत असल्यामुळे हा चक्रधरोक्त "सूत्रपाठ" महानुभावांचा वेदयुक्त ग्रंथ मानला गेला. ही सूत्रे सांगताना स्वामींनी जे जे दृष्टांत सांगितले त्याचे संपादनही केशिराजानेच "दृष्टांतपाठ" या नावाने केले. त्यामुळे हाही ग्रंथ चक्रधर वचनांनी युक्त असाच आहे. त्यामुळे या ग्रंथाला महानुभाव पंथात श्रुतींची प्रतिष्ठा लाभली. या विवेचनातून दृष्टांतपाठ हा एक श्रुती ग्रंथ असल्याचे जसे स्पष्ट होते, तसेच या ग्रंथाची निर्मिती कशाप्रकारे झाली याचेही स्पष्टीकरण मिळते.

२) दृष्टांतपाठाचाकर्ता "केशिराजबास:

"दृष्टांतपाठा"चा संकलन केशिराजव्यास ही महानुभाव संप्रदायाच्या आदिकाळातील एक ख्यातनाम व्यक्ती होय. महानुभाव संप्रदयाचे तात्त्विक अधिष्ठान दृढ बनविण्यात त्यांचे कार्य श्रेष्ठ दर्जाचे आहे. परंतु आपल्या संप्रदायातील मान्यवर व्यक्तींची चरित्रवृत्ते ग्रंथित करण्याच्या बाबतीत अग्रेसर असणाऱ्या महानुभाव परंपरेला केशिराजांचा पूर्व चरित्राशी पंथीय संबंध नसल्याने उपलब्ध होऊ शकले नाही.[१] मात्र स्मृतिस्थळातून त्यांच्या संबंधीच्या ज्या स्मृती आलेल्या आहेत, त्यातून त्यांचे पंथीय जीवन आपणांसमोर उभे राहते. स्मृतिस्थळातून त्यांचे जे जीवन आपणांपुढे उभे राहते, ते एक योगी, तत्त्वचर्चक व ज्ञानी पुरुष या नात्याने. त्यांच्या आत्यंतिक वैराग्याचे प्रभावी दर्शन स्मृतिस्थळातील काही स्मृतितून दिसून येते. स्मृतिकार त्यांच्या वैराग्याबद्दल स्मृ.क्र. १३ मध्ये म्हणतात की, पंथाची दीक्षा घेतल्या नंतर त्यांच्या घरच्या लोकांनी त्यांना पुनश्च संसारात ओढण्याचा प्रयत्न केला. परंतु केशिराज त्यांच्या सर्व प्रयत्नांना पुरून उरले. काही दिवस तर रात्रीच्या वेळी त्यांना पत्नीसह एका खोलीत कोंडून ठेवले. परंतु तरीही त्यांचे वैराग्य ढळले नाही. तेव्हा त्यांची पत्नी स्वतःच म्हणाली,

"आतां यासि जावो या: आता हे योगीये जाले-"[२]

केशिराजांचे हे आत्यंतिक स्वरूपाचे वैराग्य पाहून नागदेवाचार्यांनी त्यांचा पुढील शब्दात गौरव केला.

"माझा केशव शुक्योगींद्र कि. गा; म्हणौनि थोरची प्रसंसीले:" केशिराजांचे हे वैराग्यपूर्ण वागणे त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यातही उपयुक्त ठरले. कारण एकदा ते असेच भिक्षा मागावयास गेले असता त्यांच्या कांतीचे सौंदर्य, मुखावरील ज्ञानतेज पाहून एका व्यापाऱ्याची तरुण मुलगी त्यांच्याकडे आकर्षित झाली. इतकेच नव्हे तर ते ज्या देवळात मुक्कामास होते. तेथे रात्री त्यांच्याकडे गेली. हा मोहात टाकणारा अनिष्ट प्रसंग आहे हे ज्ञानीकेशिराजांनी ओळखले व "उवाया" जातो म्हणून ते त्या प्रसंगातून अथवा अरिष्टातून सुटले. हा सर्व वृत्तांतही स्मृतिस्थळातील "अनिष्टत्यागी केशवमार्गरक्षणानुवाद"[3] या स्मृतीत आला आहे. अशाप्रकारे अत्यंत सचोटीने, वैराग्यपूर्णवृत्तीने राहणारे केशिराजमुनी होते. त्यामुळेच चक्रधरासारख्या थोर विभूतीचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत नेण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले. आपल्या वैराग्यपूर्ण जीवनावर थोडीसुध्दा छाया त्यांनी पडू दिली नाही अथवा सांसारिक, घरगुती जीवनाची थोडीसुध्दा छाया त्यांनी पडू दिली नाही. लोकांचा बोल लागू नये म्हणून त्यांच्याशी चर्चा करणाऱ्या स्वत:च्या बहिणीसही त्यांनी स्वत:पासून दूर राहावयास सांगितले.[४] अशा निष्ठेने व प्रखरतेने त्यांनी स्वत:ची जपवणूक केली. त्यामुळे ते महान योगी म्हणून गौरविले गेले. अशा वैराग्यपूर्ण जीवनात पंथाची उभारणी, चक्रधरांची सूत्रे वाचने-आठवणे, त्यातील महान तत्त्वांची चर्चा करणे. हा त्यांचा जीवनक्रम होता. त्यातूनच त्यांचे ग्रंथ निर्माण झालेले आढळतात. "रत्नमाळा स्तोत्र", "सूत्रपाठ", "दृष्टान्तपाठ" या महत्त्वाच्या ग्रंथाबरोबर इतर स्फुट स्वरूपाचेही लेखन केशिराजाने केले. ग्रंथांची निर्मिती करताना तत्त्वचिंतनात्मक अथवा ग्रंथाच्या आशयाच्या

संबंधाने ते चर्चाही करीत. चर्चा करताना पांडित्याने ओतप्रोत भरलेल्या केशिराजांच्या ज्ञानसागराला भरती येत असे. दामोदर पंडित, राघवभट व केशिराज हे सारखो तत्त्वचर्चा करीत. त्यातून त्यांचे विचार व ज्ञान अधिकच प्रगट होत असे. अशा विविध स्वरूपातून केशिराजांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व स्पष्ट होते. त्यांच्या या सर्वांगीण व्यासंगामुळेच दृष्टांत-पाठातील दृष्टांतांचे स्पष्टीकारण अधिक व्यापकतेने व परिणामकारकतेने ते करु शकले. त्यांच्या कार्यांचे स्वरूप लक्षात घेऊन रमेश आवलगावकर म्हणतात[5] की, "महानुभावांमध्ये आणि एकूणच संतांमध्ये व साहित्यविषयक कामगिरीमध्ये केशिराज व्यासांचे कार्य लक्षणीय आहे." त्यांच्या या कार्यामुळेच केशिराज असामान्य व्यक्तीमत्त्वाचे थोर पुरुष म्हणून आणि महानुभाव पंथाचे भूषण म्हणूनही ओळखले जातात.

### ३) दृष्टांतपाठ: रचना व स्वरूप

महानुभाव वाङ्मयात दृष्टान्त पाठाला व त्यातील रचना स्वरूपाला महत्त्व आहे. दृष्टांतपाठाची निर्मिती करताना केशिराजाने दृष्टांताची मांडणीही वैशिष्टयपूर्ण केली. दृष्टान्तपाठातील प्रत्येक दृष्टांत हा त्रिकांडात्मक आहे. प्रथम श्रीमुखीचे सूत्र, त्याखाली स्वामींनीच सांगितलेला पण वरच्या सूत्राची सुसंगत ठरणारा दृष्टांत आणि त्या सूत्र-दृष्टांतातून सुसंगत काढलेला आशय म्हणजे दार्ष्टान्तिक होय. थोडक्यात सूत्र-दृष्टांत व दार्ष्टान्तिक अशी दृष्टांतांची रचना आहे. असे एकूण ११४ दृष्टान्त "दृष्टांतपाठा"त संकलीत केलेले आहे. सूत्रे आणि दृष्टांत यांची निवड "लीळाचरित्रांतून" केलेली आहे. म्हणजे सूत्र व दृष्टांत हा भाग चक्रधरोक्त आहे. आणि दार्ष्टान्तिक मात्र केशिराजाचे आहे.

दृष्टांताच्या या रचनेबद्दल अभ्यासकांत काही मतभेद आढळतात. महानुभाव वाङ्मयाचे गाढे अभ्यासक डॉ. शं.गो. तुळपुळे[6] या बाबत

म्हणतात की, "ही रचना दुहेरी स्वरूपाची आहे. म्हणजे सूत्र व दृष्टान्त चक्रधरांचे व दार्ष्टान्तिक केशिराजाचे." तसेच, "११४ पैकी प्रत्येक दृष्टांताचा पहिला दोन-तृतीयांश भाग केशिराजांनी "लीळाचरित्रातून" जसाच्या तसा घेतला असा नाही. म्हणून पुढे ते म्हणतात की, "दृष्टांतपाठातील दृष्टांत हा भाग जो चक्रधरांचा म्हणून समजला जातो तो सर्वस्वी तसा नसून त्यात केशिराजांचा काही वाटा आहे." असे मत मांडण्याचे कारण म्हणजे चक्रधरस्वामींचे काही दृष्टांत हे केवळ नामोल्लेखाच्या स्वरूपापुरतेच येतात. किंवा "लीळाचरित्र" कारांनी त्याचा विस्तार न देता फक्त नामोल्लेख केलेला दिसतो. केशिराज हे दृष्टांताचे विश्लेषणच करीत असल्याने त्यांनी सर्व दृष्टान्ताचे सविस्तार विवेचन करणे योग्यच होते. ते तसे त्यांनी केले. ते दृष्टांत मुळात चक्रधरांचेच असावेत. किंबहुना ते चक्रधरांचेच असावेत असे मत ठामपणे डॉ. कोलते यांनी मांडले. त्याचे म्हणणे असे की, "लीळा चरित्रात हे सर्व दृष्टांत असलेच पाहिजे. हे निर्विवाद होय. म्हणूनच केशिराजांना ते "लीळाचरित्रातून वेगळे काढून संकलित करता आले" व त्यावरून त्यांचा दृष्टांतपाठ हा ग्रंथ तयार झाला. येथे आपल्याला आणखी एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते ती अशी, केशिराज दृष्टांत सांगत नाहीत. तर चक्रधरांनी जो दृष्टांत अल्पशा स्वरूपात मांडला अथवा सांगितला त्याचे ते व्यापक स्वरूपात विश्लेषण करतात. त्यामुळे "लीळाचरित्रा" तील दृष्टांताचे व्यापकत्त्व व विश्लेषणात्मक चित्रण दृष्टांतपाठातील विस्तारीत दृष्टांताच्या मांडणीतून आपणांस अनुभवता येते.

दृष्टांतपाठातील सर्व दृष्टांत तात्त्विक विचाराने भरलेले आहेत. हे या ग्रंथाचे आणखी एक स्वरूपवैशिष्ट्य मानावे लागेल. महानुभावांचे तत्त्वज्ञान सूत्र स्वरूपात केशिराजांनी ग्रथित केले होते. तेच येथे अधिक स्पष्ट करण्याचा त्यांचा विचार असल्याने या लेखनाला तात्त्विक विचाराचीही जोड मिळालेली आहे. हा तात्त्विक विचार दृष्टांतपाठातील सूत्र व

दृष्टान्तिक यांतून स्पष्ट होताना दिसतो. दृष्टांतपाठातील प्रत्येक सूत्र हे तत्त्वविचारांनी व्यापलेले आहेत. परमेश्वर जीवांविषयींच्या अपार करुणेपोटीच अवतार घेतो आणि मातेच्या वात्सलतेने जीवांचा उध्दार करतो. परंतु मातेवर सर्व प्रकारे विसंबून राहणाऱ्या बालकाच्या अनन्यतेने जीवांनी त्याला अनुसरले पाहिजे. हाच प्रधान तत्त्वविचार या सर्व दृष्टान्तातून आढळतो. जीव व त्याचा परमेश्वराशी येणारा संबंध, त्याकडे पाहण्याची जीवाची दृष्टी असे सर्वस्वी जीव आणि परमेश्वर यांच्या तत्त्वमय विचाराची सांगड या दृष्टान्तात घातलेली आहे. त्याच्या अधिक स्पष्टीकरणार्थ नेहमीच्या मानवी जीवनातील दृष्टान्ताचे विश्लेषण दृष्टान्तपाठातून केशिराजाने केलेले आहे.

४) दृष्टांत व्याख्या:

दृष्टांत या शब्दाचा साधा किंवा सरळ अर्थ म्हणजे स्पष्टीकरणार्थ दिलेला दाखला. काही अभ्यासकांनी दृष्टांत या शब्दाची सूक्ष्मतेने व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

विश्वनाथ व्यासांनी लिहिलेला १६व्या शतकातील "दृष्टांतस्थळ" या महत्त्वाच्या टीपग्रंथात "दृष्टाचा अंती अदृष्ट बुझावीले म्हणौनि दृष्टांत बोलिजे" अशी व्याख्या केली आहे. लक्षण रत्नाकरात दृष्टांताची व्याख्या" "येन दृष्टं प्रमेयान्तस्तं दृष्टान्त प्रचक्षते" अशी व्याख्या केली आहे. या सर्व व्याख्यांचा सारांश थोडक्यात असा की, "अनाकलीय असे तत्त्व आकलनीय व्हावे, अज्ञात तत्त्व ज्ञात व्हावे. म्हणून नित्याच्या अनुभवातील जे दाखले दिले जातात त्यास दृष्टांत असे म्हणतात."[८] दृष्टांत या शब्दाची ही अगदी अचूक व्याख्या म्हणावी लागेल. केशिराजांच्या दृष्टांताच्या स्वरुपाकडे पाहिले असता त्यातील सहजता व तत्त्वाच्या स्पष्टीकरणार्थ आलेला सोपेपणा सहज साध्य झाला आहे. दृष्टांताच्या व्याख्येप्रमाणे दृष्टांताचे

काही प्रकारही सांगितलेले आहेत. ते सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे होत. अंशाग्राह्य, समग्रांशग्राह्य, अन्वय, अप्रत्यन्वय, योगज आणि वास्तव हे होत.[९]

५) मोकळे दृष्टांत:

"लीळाचरित्रा"तील काही दृष्टांतांचा समावेश "दृष्टांतपाठा"त झालेला नाही. तथापि हे दृष्टांत महानुभाव संप्रदायात प्रचलीत आहेत. त्यांनाच महानुभाव सांप्रदायिक "मोकळे" अजूनही ग्रंथनिबध्द न झालेले दृष्टांत म्हणतात. केशिराजांनी फक्त ११४ दृष्टांत घेऊन त्यावर दृष्टांतपाठाची निर्मिती केली आहे. या व्यतिरिक्त आणखी १२१ दृष्टांत मोकळे असल्याचे अभ्यासकाचे मत आहे. डॉ. व.दि. कुलकर्णी यांनी या मोकळ्या दृष्टांतावर लेखन केले आहे. त्यांचे हे संशोधन मराठी संशोधन पत्रिकेतून तर काही दृष्टांताचे विवेचन त्यांनी "महानुभाव" या मासिकातून केले आहे. तसेच डॉ. यू.म. पठाण, डॉ. बापूजी संकपाळ यांनीही अशा प्रकारचे संशोधन केलेले आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधात "दृष्टांतपाठा"त जे ११४ दृष्टांत आहेत त्यांचाच विचार केलेला आहे. मोकळे दृष्टांत हे केवळ उपमानांची यादी असल्यासारखे आहेत.[११] तसेच आपल्या लेखनाच्या अभ्यासात ते अंतर्भूत होत नाहीत. इतकेच काय पण "लीळाचरित्रा"तील मोकळे दृष्टांत हा अभ्यासाचा अथवा संशोधनाचा एक वेगळाच विषय होऊ शकतो. अशा विविध कारणांमुळे सदरच्या लघुप्रबंध लेखनात "दृष्टांतपाठा"त जेवढे दृष्टान्त आले व त्यातून जी सामाजिक परिस्थिती उभी राहते तिचाच विचार केलेला आहे.

६) दृष्टांतातील कथात्मक गद्याचे सौंदर्य:

प्राचीन मराठी वाङ्मयातील महानुभावीय गद्य वाङ्मय अनेक दृष्टींनी

वैशिष्टपूर्ण आहे. केवळ गद्यात्मक स्वरूप हे या वाङ्मयाचे प्रमुख वैशिष्टय तर आहेच पण त्याशिवाय इतरही वैशिष्ठये या लेखनाची आढळतात. "लीळाचरित्रा"तून चरित्रात्मक लेखनाचे सौंदर्य-स्वरूप आपणांपुढे उभे राहते. "स्मृतिस्थळ" या गद्य ग्रंथातूनही प्रभावी लेखन झालेले आहे. "लीळाचरित्र" व "स्मृतिस्थळ" या गद्य ग्रंथाप्रमाणे "दृष्टांतपाठ" ही गद्यात्म लेखनाच्या बाबतीत एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे.

"दृष्टांतपाठा"तील सूत्र व दार्ष्टान्तिक वगळून दृष्टांताचा जो भाग आहे, त्या भागाचे लेखन सौंदर्य महत्त्वपूर्ण आहे. हे स्वरूप स्वभावत: कथात्मक आहे. "आजच्या साहित्यपरिभाषेत सांगावयाचे तर ते ११४ दृष्टांत म्हणजे लघुतम कथाच आहेत."[१२] असे या दृष्टांताबद्दल रा.शं. नगरकरांनी मत मांडले ते संयुक्तिक वाटते. कारण चक्रधरस्वामींनी जे दृष्टांत घेतले त्याचे मूळ स्वरूपही कथांशी जुळणारे आहे. या दृष्टांतांना असे कथात्मक स्वरूप प्राप्त होण्यास कथन कौशल्याचा भाग त्यात आढळतो. श्री. चक्रधरस्वामींनी वेळो-वेळी आपल्या अनुयायांना अनेक कथा सांगितल्या आहेत. अशा प्रकारच्या अनेक कथा "लीळाचरित्रा"च्या उत्तरार्धात येतात. "लीळाचरित्रातील अशा काही कथांनाच पुढे दृष्टांतरूप लाभल्याचे आढळतो. त्यामुळे "कथन-कौशल्य" हा एक महत्त्वाचा गुणधर्म आढळतो. असे मत डॉ. पठाणांनी[१३] व्यक्त केले. ते यथार्थ आहे. कारण चक्रधर-स्वामींनी अनेक भागात स्वत: पायी प्रवास केला होता. लोकांना उपदेश करताना त्यांनी अगदी सहजपणे या दृष्टांतांचे कथन केल्याचे आढळते. दृष्टांतकथांना आणखी एक महत्त्वाची बाजू प्राप्त झालेली दिसते. ती म्हणजे प्रचलित लोककथांची होय. "दृष्टांतपाठा"तील पुष्कळ दृष्टांत कथातून असे स्वरूप आढळते. त्यामुळे त्यातील अनुभव अत्यंत समर्थपणे वाचकांना गोचर होतो. समजण्यास सोपा वाटतो. "हत्ती आणि आंधळे" यांची चिरपरिचित कथा ही अशाच प्रकारची एक कथा होय. तसेच "बांदकरीयाचा दृष्टांत",

"माळेकराचा दृष्टांत" या सारखे दृष्टांत हे कथात्मक स्वरूपाचेच आहे. हे दृष्टांत लोककथांच्या पातळीवर जातात. त्याचे महत्त्वाचे आणखी एक कारण असे की स्वत: चक्रधरस्वामी दृष्टांताचा नामोल्लेख करतात. याचाच अर्थ असा की, या कथा तत्कालीन समाजात रूढ होत्या. त्यांचा "दृष्टांत" अथवा "दाखला" देऊन चक्रधरस्वामी स्वत:च्या तत्त्वाचे स्वरूप विशद करतात. केशिराजांनी नंतर हेच दाखले अथवा "दृष्टांत", "दृष्टांतपाठा"त घेऊन त्यानुरोधाने आलेल्या कथा सविस्तारपणे सांगितलेल्या आहेत. मात्र सर्वच दृष्टांत असे लोकजीवनाचे अथवा लोककथांचे स्वरूप घेऊन येतात असे नव्हेत.

कथन शैलीप्रमाणे "संवाद" हे दृष्टान्ताचे लक्षात घेण्याजोगे वैशिष्टय होय. या कथांतील संवादांची गुंफणही अत्यंत कलात्मक आहे. कथेतील अनुभव अधिक परिणामकारक करण्यासाठी स्वामींनी योजलेले ते एक प्रभावी माध्यम होय. या संवादातून तो प्रसंग, त्याच्याशी संबंद्ध असलेल्या व्यक्ती आपल्या समोर उभ्या राहतात. अशा संवादात्मक पद्धतीने विश्लेषण डॉ. द.भि. कुलकर्णी[१४] यांनी "बांदीकरीयाच्या दृष्टांता"द्वारे अधिक चांगले स्पष्ट केले आहे. "बांदिकरीयाच्या दृष्टांतात," रावो, पंचनगरे, गाणे-भाटे आदी, मैळा इत्यादी मधील संवाद आठ वेळा आलेला आहे. जेमतेम वीस ओळीच्या कथेत इतके संवाद आहेत ." या प्रमाणे "लेंभणेयाचा दृष्टांत", "इसाळूवाचा दृष्टांत" या दृष्टांतातून प्रभावी संवाद येतात. या संवादामुळे दृष्टांतकथेतील तपशीलाला व कथनाला एकदम जीवनसदृश्यता लाभते.

या सर्व दृष्टांतात कलात्मकता आहे. संवाद, मांडणी, पात्रे यामुळे यातील कथा आजच्या अथवा अर्वाचीन लघुकथेशी नाते जोडणाऱ्या आहेत. त्यातून विविध व्यक्ती प्रसंगाप्रमाणे जीवनचित्रही आपणापुढे शब्दांकित होते. त्यामुळे दृष्टांतपाठातील दृष्टांत हे केवळ "दाखले" नाहीत तर त्या उत्तमोत्तम अशा कथाही आहेत. हे ध्यानात घ्यावे लागते. कोणत्याही स्वरूपाचा

विस्तार न करताही त्यातील कथात्मकता सामग्र्याने सांभाळलेली आहे. प्रत्येक कथेत निवेदकाच्या अनुभवाची आशयघनता आलेली आहे. तसेच सूत्र आणि दार्ष्टान्तिक यांचा आश्रय न घेताही वाचकास केवळ दृष्टांतातून काही तरी विशेष जाणवल्यावाचून राहत नाही.

दृष्टांतातील अनुभवविश्व अतिशय हृदयंगम आहे. अतिशय संपन्न असे आहे. चक्रधरस्वामी समाजाच्या ज्या ज्या स्तरातून वावरले. जे समाजस्थ त्यांच्यापुढे आले. त्यामुळे या दृष्टांतांना सामाजिकतेचे एक वेगळेच परिमाण प्राप्त झालेले आहे. विशेषत: सर्वसामान्यांचा समाज हा प्राचीनकाळी कसा होता. त्याचे सूक्ष्म दर्शन आपणांस या दृष्टांतातून घडते, या दृष्टांतावर भाष्य करताना डॉ. तुळपुळेंनी म्हटलेले आहे की, "दृष्टांतपाठातील सूत्र व दार्ष्टान्तिक यातून तत्त्वदर्शन घडते, तर दृष्टांतभागात समाजदर्शन आहे. तत्कालीन समाज जीवनाचे हे दर्शन मुद्दाम घडविलेले नाही, तर ते सहज घडते. तसेच चक्रधरांची प्रतिमासृष्टी सांकेतिक नाही, तर व्यावहारीक अनुभवातील आहे." त्यामुळे लौकिक सृष्टी बरोबरच मानवी स्वभावाचे स्वरूपही आपणापुढे उभे राहाते. अशा विविध कारणांनी "दृष्टांतातून जी कथा-स्वरूपे अवतीर्ण झालेली आहेत ती तत्कालीन समाजजीवनावर प्रकाश टाकणारी आहेत. या कथा जशा लोकजीवनाशी संबंधित आहेत तशाच समाजाशीही. समाज सापेक्षता हा या दृष्टांताचा महत्त्वपूर्ण गाभा आहे. भाषा संवाद, शब्द, वाक्प्रचार, व्यवहार, चालीरिती. अशा अनेक माध्यमातून हे समाज जीवन साकारलेले दिसते. आतापर्यंत दृष्टांतपाठ व दृष्टांताचे स्वरूप याचे विवेचन केले. यापुढे या दृष्टांतातून जे समाजजीवन साकारलेले आहे, जो मानवी समाज १३व्या शतकात वावरत होता त्याचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. समाजजीवनाशी जे जे घटक संलग्न असतात ते ते सर्व लक्षात घेऊन स्पष्टीकरण केलेले आहे.

## ७) दृष्टांतपाठात आढळून येणारे समाजजीवन:

आपले तत्त्वविचार स्पष्ट करण्याच्या हेतूने श्रीचक्रधरस्वामींनी दृष्टांत सांगितले. हे विचार ज्यांना समजावून सांगावयाचे तो समाज सर्वसामान्यांचा होता. सर्वसामान्य जनतेला जे समजावून सांगायचे ते त्यांच्या भाषेत - लोकभाषेत सांगायला हवे होते. ते चक्रधरस्वामींनी सहजतेने साधले. कारण चक्रधरस्वामी सर्वत्र संचार करणारे होते. त्यामुळेच त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणातून झालेला आहे. त्यामुळे ते सांगणाऱ्या व्यक्तींच्या काळाचे प्रतिबिंब त्यात उमटणे स्वाभाविकच होते. याकारणामुळे चक्रधरस्वामींच्या काळाचे म्हणजेच यादवकाळाचे सर्वांगिण स्वरूप या दृष्टांतातून उभे राहते. "लीळाचरित्र", "गोविंदप्रभुचरित्र", "स्मृतिस्थळ" या ग्रंथातूनही हे चित्रण येते. "दृष्टांतपाठातून जे चित्रण आले आहे त्याला तत्त्वविचारांची जोड आहे. तरीपण या लघुकथासापेक्ष दृष्टांताचे स्पष्टीकरण करताना समाज जीवनाचे विविध स्वरूपही आपणापुढे येते. ही विविधता पुढील प्रमाणे आहे.

### अ) शासन व्यवस्थेचे किंवा राजव्यवस्थेचे स्वरूप:

प्राचीन महाराष्ट्रात लहान-मोठया अनेक राजवटी निर्माण झाल्या. त्यापैकी यादव राजांची राजवट अनेक दृष्टींनी महत्त्वाची मानली जाते. चक्रधरस्वामी याच राजवटीच्या काळात समाजात वावरत होते. त्यामुळे राजा व त्याचा राज्यकारभार, जनतेकडे पाहाण्याची राजाची वृत्ती. जनतेला न्याय अथवा संरक्षण देण्याचे राजकीय स्वरूप, याचे अनेक बारकावे चक्रधरस्वामींनी सांगितलेल्या दृष्टांतातून येतात. चक्रधरस्वामी राजा या अर्थी "रावो" शब्द वापरतात.

यादव राजे हे अनेक दृष्टींनी आपल्या राजकीय, हक्काचा अथवा अधिकाराचा वापर करताना आढळतात. १३व्या शतकात राजा हाच सर्वंकष

सत्ताधारी होता. त्यामुळे तत्कालीन समाज जीवनात राजा महत्त्व होते. हे चित्र "दृष्टांतपाठा"तील अनेक दृष्टांतातूनही दिसून येते.

दृ.८ मध्ये रत्ने विकणारे व्यापारी राकडे जातात राजा रत्न-पारख्यांना बोलावून, रत्नांची पारखा करून ती घेतो. यावरून अशा व्यवहारास राजाश्रय असल्याचे दिसते. वाटमारी करून जनतेची लुटमार करणाऱ्यास राजाकडे नेले जात असे. राजा त्याची सर्व चौकशी करून त्या चोरास अथवा वाटमारी करणाऱ्यास शिक्षा देत असे. (दृ. १३). दृ. १६वा "बांदिकरीयाचा दृष्टांत" हा तर तत्कालीन समाजजीवनाच्या सर्वांगावर प्रकाश टाकणारा दृष्टांत आहे. त्यात राजा आणि गुलाम हे स्वरूप आढळते. राजेलोक स्वत:कडे गुलाम ठेवत. तसेच राजा, नंतर पंचनगरे म्हणजे पाच नगराचे अधिकारी व नंतर इतर अशी एक राज्य-व्यवस्थेची पध्दत आढळते. अनेक वेळा जे काम राजाला जमत नसे ते सर्वसामान्य जनतेकडून केले जाई. त्यासाठी राजा कधी कधी "विडा"ही देत. अनेकदा राजाचे काम करून त्याच्याकडून लोक धन्यवाद घेत. तसेच एखादी चांगली सुंदर वस्तु राजाला भेट देऊन त्याला खुष ठेवले जात असे. (दृ.४०). त्यावेळेस राजा अशा व्यक्तिला बक्षीसी देई. काही राजे पर्वकाळी ब्राह्मणांना दान देत. (दृ. ५७) राज्यव्यवस्थेवर प्रकाश टाकणारा आणखी दृष्टान्त म्हणजे "सींदेराणेयाचा" दृष्टांत होय. यात राजावर राज्यभ्रष्ट होण्याचे संकट येते. त्यावेळेस त्याच्या आसपासचे लोक त्याला सोडून जातात. सिंदे-राणेसारखा एखादा मात्र निष्ठेने वागतो. काही काळानंतर राजा पुन: सत्तेवर आल्यावर सिंदे-राणे यांना सन्मानाने वागवतो. इतकेच नव्हे तर आपल्या राज्याचा निम्मा वाटा देऊन आपल्या बरोबरीचे स्थान देतो. पण असे एकनिष्ठ राजे क्वचित आढळतात.

"रिणाइताचा दृष्टांत"तून आणखी एका परोपकारी राजाचे चित्रण आलेले आहे. रिणाइताच्या अर्ध्या कर्जाची परत फेड एक नैतिक कर्तव्यसमजून

राजाने केली. काही राजे शिकार करावयास जात. राजाच्या शिकारीच्या छंदाचे वर्णन (दृ. ७७) मध्ये येते. अशा कामासाठी वापरात येणाऱ्या घोड्याची देखील राजेलोक काळजी घेत असल्याचे आढळते. जनसेवा अथवा समाज कर्तव्य म्हणून या राजांच्या वर्तनाचे हे चित्र निश्चितच उच्चदर्जाचे मानावे लागते. राजाप्रमाणे त्याचे पुत्र अथवा स्वामींनी म्हटल्याप्रमाणे "डींगरे" मात्र वेगळ्याच वृत्तीचे आढळतात. राजांची ही मुले अनेकवेळा किंमती वस्त्रे अथवा इतर वस्तु नेऊन मौज मजा करीत. पण हे पुत्र जेव्हा राजाचा खजिनाच फोडित अथवा त्यातील संपत्ती घेत. तेव्हा मात्र राजा ते सहन करीत नसे. (दृ. ८१). राजपुत्रांचे हे वर्तन निश्चितच तत्कालीन राज्यव्यवस्थेवर भाष्य करणारे आहे. चित्र स्पष्ट करणारे आहे. शरण आलेल्यास अभय देण्याचे राजकर्तृत्त्व राजा बजावीत असे. मात्र राज्याभिषेकाकरून स्वत:चे राज्य आपल्या पुत्रालाच देई. वंश परंपरागतेचे हे स्वरूप प्राचीन काळापासून आढळते. (दृ. ११२, ११३).

या सर्व चित्रणातून राज्यव्यवस्थेचे चित्र आपणापुढे उभे राहते. राजा समाजाशी एकरूप होतो. चोरांना शिक्षा देतो. तर रिणाइताचे रिणही फेडतो. अनेक लोक राजाला खुश ठेवण्याचा प्रयत्न करीत. अशांना राजा बक्षीस देत असे. तसेच शरण येणाऱ्यास अभय देण्याचा मोठेपणाही राजा दाखवी. राज्याधिकार मात्र स्वत:च्याच पुत्रास देत असे. पारंपारीक राज्यपध्दतीचे जीवनदर्शन या सर्व दृष्टांतातील चित्रणातून प्रभावीपणे आलेले आहे. "पंचनगरे" या स्वरूपातून नगराचे अधिकारी ठरवून त्यांच्याकडून त्या त्या नगराचे कामकाज अथवा कारभार राजा करून घेत असावा. राजाने केलेली ही राज्यव्यवस्थाही लक्षात घ्यावी लागते.

ब) समाजातील विविध व्यवसाय:

कोणत्याही राज्याचे वैभव हे त्या राज्यात चालणाऱ्या व्यापारावर अथवा उद्योग-धंद्यावर अवलंबून असते. उद्योग-व्यवसायातून आर्थिक परिस्थितीचे

स्वरूप आकळावला येते. व्यापार व त्यानुरोधाने होणारी उलाढाल ही राज्याच्या समृध्दीचे, भरभराटीचे एक लक्षण असते. म्हणून १३व्या शतकातील व्यापार-उद्योग व व्यवसायाचा विचार करताना यादवांच्या राजवटीत चालणाऱ्या व्यवसायांचे स्वरूप समजावून घ्यावे लागते.

दृष्टांत पाठात जे अनेकविध दृष्टांत आलेले आहेत, त्यापैकी पुष्कळ दृष्टांतातून तत्कालीन समाजातील व्यवसायाचे चित्र आपणापुढे स्पष्ट होण्यास मदत होते. "समुद्राचा दृष्टांत" (क्र.८) या दृष्टीने महत्त्वाचा मानावा लागेल. सागर प्रवास हा एके काळी वर्ज्य मानला गेला होता. पण यादव राजवटीत सागरी सफर व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली होती. कारण समुद्रातील माणिक-मोती, तसेच रत्ने यांचा व्यापार यादवांच्या काळात भरभराटीस आलेला होता. स्वत: राजा रत्न पारखी बोलावून रत्ने खरेदी करीत असे. या व्यवसायास राजाश्रय मिळालेला होता. विशेषत: यादवांची राजधानी देवगिरीला हे व्यापार जोरात चालत. त्याबद्दल पानसे मु.ग.[१६] म्हणतात की, "देवगिरीची जवाहिराच्या व्यापारासाठी ख्याति होती. तेथे हिरे-माणकांना पैलू पाडण्याच्या कामाप्रमाणे सोन्या-चांदीची आणि इतर बारीक कलाकुसरीची कामे सुबक होत असत." यावरून अशा व्यवसायांना राजाश्रय असल्याचे स्पष्टच होते. तांबे, पितळ अथवा धातूंची भांडी बनविली जात असल्याचे उल्लेख येतात. (दृ.७). अशा धातूवरील कलाकुसरीच्या उद्योगाला महत्त्व असल्याचे दिसते. तांबे-चांदी याप्रमाणे हिऱ्यांचा व्यापारही होत होता. (दृ.१०). राजधानीत असे विविध स्वरूपाचे उद्योग-व्यापार चालत असत. समाजाच्या इतर स्तरात मात्र शेती हाच प्रमुख व्यवसाय आढळतो. स्मृतिस्थळातही शेतीच्या व्यवसायाचे वर्णन आले आहे. तसेच दृष्टांतपाठातूनही शेतीच्या इतर बाबींवर प्रकाश पडतो. शेतीची राखण करणे (दृ.१२-५०) शेतीच्या कामासाठी उपयुक्त अवजारे तयार करणे. यावरून शेतीचे महत्त्व पटते.

शेतीतील तन नांगरणे (दृ.२८) माच्यावर उभे राहून राखण करणे (दृ.५०), तसेच कुळव, विळा वगैरे शेतीची अवजारे (दृ.५४) त्यावेळी तयार केली जात असत. थोडक्यात शेतीस उपयुक्त अवजारे बनविणारे कारागीर अथवा त्यांचे उद्योग याचे उल्लेख दृ. २८, ५४, ७६, ५० यातून आढळतात. हे सर्व अवजारे लोहार बनवित असत. त्याचा उल्लेख (दृ.४०) मध्ये येतो.

शेतीच्या व्यवसायाहोरीज पुटाणे करणारा (दृ.६६) व "गुळव्या" (दृ.६७) या उद्योग धंद्यांचे वर्णन आलेले आहेत. गूळ कसा तयार केला जातो याचे तपशिलवार वर्णन (दृ.६७) मध्ये येते. तसेच लोहाराचा धंदा कसा चालतो, तो जनतेशी तसेच राजाशी कसा वागतो. याचेही सूक्ष्म वर्णन दृ. ४० मध्ये येते. याशिवाय तत्कालीन समाजात सावकारी व्यवसाय चालत होता. "रिणाइताच्या" दृष्टांतातून (दृ.क्र.५७) या व्यवसायाचे चित्र उभे राहते. क्वचित ठिकाणी आचारी (दृ.क्र.१६) आढळतो. तर एखादी अहिरदेशातील म्हातारी (दृ.९१) दळण-कांडण करून गुजरण करताना आढळते. या व्यवसायांबरोबरच सामान्य स्त्री यांच्या व्यवसायाचे वर्णनही काही दृष्टांतातून येते. यावरून हाही धंदा प्राचीन काळापासून समाजात रूढ असल्याचे दिसते. समाजातील सर्व स्तरांचे सर्व प्रकारचे व्यवसाय दृष्टांतातून येतात. त्यातून नागर जीवनातील व्यवसायाप्रमाणे ग्रामीण भागातील शेतीच्या अथवा इतर किरकोळ स्वरूपाच्या व्यवसायाचे चित्र आपणापुढे येते.

दृष्टांतपाठातील दृष्टांतातून तत्कालीन समाजात चालणाऱ्या उद्योग-व्यवसायाचे दर्शन आपणांस घडते. त्यातील विविधता व व्यापकताही त्यातून स्पष्ट होते. कष्टकरी कारागीरांचे व्यवसाय व उद्योगांची उन्नतीही दिसते. कलाकुसर अथवा नक्षीकामाला याकाळी किती महत्त्व आलेले होते याची जाणीव होते. अशा विविध उद्योगांसाठी व्यापारासाठी कोणते चलन अथवा कोणकोणती नाणी वापरात आणली जात होती. याचे

उल्लेख मात्र येत नाहीत. "लीळाचरित्रा"च्या उत्तरार्धात मात्र व्यापारासाठी वापरात असलेली वेगवेगळी नाणी अथवा चलनं याची वर्णने येतात. कारण अर्थव्यवहारच काय पण कोणताही व्यापार हा चलनावाचून होऊ शकत नाही. डॉ. तुळपुळे यांनी त्यावेळी वापरात असलेले चलन म्हणून, कवडा, पाइका, रूका किंवा रुवा, दाम आणि आसु हे सांगितले आहेत. आसु हे नाणे सोन्याचे होते. याचा उल्लेख करण्याचे कारण असे की दृष्टांतपाठातील पुष्कळ दृष्टांत हे लीळाचरित्राच्या उत्तरार्धात येतात. उत्तरार्धाच्या काळात चक्रधरस्वामींचा जनतेशी अधिक संपर्क आलेला होता व त्यातूनच हे दृष्टांत पुढे आले आहेत.

क) जातीव्यवस्था:

यादव राजे हे अनेक बाबतीत पारंपारिक वृत्तीने जगणारे होते. त्यांनी वैदिक धर्म संस्कृती पूर्णपणे अंगीकारली होती. त्यावरून त्यांची परंपरागत जीवन जगण्याची पध्दती दिसते. स्वत: राज्य करणाऱ्या राजांनी वर्णाधिष्ठित धर्म संस्कृती स्विकारली होती. परिणामत: तत्कालीन समाजालाही त्याच वृत्तीने जगावे लागले. वैदिक संस्कृतीत चातुर्वर्णावर आधारीत समाज रचनेला मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे तत्कालीन समाज वेगवेगळ्या जाती-जमातीत विभागला गेला. स्पृश्य-अस्पृश्य व त्यातून निर्माण होणारी सामाजिक विषमता अधिकच वाढत गेली. जाती-पातीचे-उपजातीचे वेगवेगळे गट ही अस्तित्त्वात आले. ब्राम्हण ही एकच जात पण तिच्यातही वेगवेगळ्या उपशाखा प्रादेशिक, वर्णभेदातून त्यावेळी निर्माण झालेल्या होत्या. त्याचे तपशिलवार वर्णन पानसे मु.ग.[१८] यांनी केलेले आहे.

उच्चवर्णीय ब्राम्हण वर्गाने स्वत:च्या प्रतिष्ठेकरिता खालच्या इतर सर्व जाती-जमातींना आपणापासून कमी आधिक अंतरावर ठेवले. त्यातून

जातिभेदाची दरी अधिक रुंदावत गेली. अशा जातीभेदाचे व जातिव्यवस्थेचे दर्शन दृष्टांतपाठातील काही दृष्टांतातून आपणास घडते. "दीक्षित कन्येचा दृष्टांत" हा या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. ब्राह्मण स्त्रीने हालच्या कोळी जातीतील व्यक्तीशी संबंध ठेवल्याने इतर सर्व गोष्टींचा त्याग करावा लागला. यातुन कोळी जातीचा उल्लेख येतो. तर दृ.क्र. ११ साळी अथवा कोळी जातीचे दर्शन घडते. याप्रमाणेच लोहार (दृ.४०), मातंग (दृ.६), जात चांडाळ (दृ. ४८) म्हणजे नीच जातीचा उल्लेखही जातिभेदाचे चित्रण स्पष्ट करतात. कोल्हाटी (दृ. ९२-९३) जातीचे स्वरूपही आपणापुढे दृष्टांतपाठातून उभे राहते. या जाती ज्याच्या त्याच्या व्यवसायावरून निर्माण झालेल्या आढळतात. वर्णाधिष्ठित समाजाचे हे स्वरूप त्यावेळी अत्यंत विकृततेने ग्रासलेले होते. जातीचे उल्लंघन करणे, अथवा जातिबाह्य वर्तन करणे गुन्ह्यास पात्र ठरवले जाई.

ड) कुटुंबव्यवस्था:

कुटुंबव्यवस्था हे भारतीय संस्कृतीचे, समाज जीवनाचे अनन्यसाधारण असे वैशिष्ट्य आहे. कुटुंबपध्दतीतून अभिव्यक्त होणारे समाज जीवन व त्याचे स्वरूप प्राचीन काळापासून आढळते. कुटुंबातील व्यक्ती, त्यांचे जेष्ठ-कनिष्ठ संबंध, जिव्हाळ्याचे तसेच हर्ष-खेदाचे स्वरूप यावरून "घर" ही एक प्रभावी संकल्पना निर्माण झालेली दिसते. पती-पत्नी, मुले या सर्वांतून कुटुंबाचे व्यापकत्त्व आपणापुढे उभे राहते. परंपरागत रीतीने चालत आलेल्या या पध्दतीने जीवन जगण्याचे काही आदर्श तर काही नैतिकतेचे मापदंड निर्माण केलेले आहेत. रामायण-महाभारत यासारख्या आर्षमहाकाव्यातूनही कुटुंब-संस्थेचे प्रभावी चित्र आपणापुढे उभे राहते.

कुटुंबसंस्था हा कोणत्याही समाज जीवनाचा अविभाज्य असा भाग असतो.

त्यामुळे त्या त्या काळी निर्माण झालेल्या साहित्यातून अथवा ग्रंथातून सहजपणे कुटुंबव्यवस्थेचे चित्रण येते. त्यावरून त्या त्या व्यक्तींचे संबंध, व्यक्तीजीवनाचे स्वरूप आपणापुढे उभे राहते. दृष्टांतपाठातील काही "दृष्ठांतातून"ही यादवकालीन समाजात असलेल्या या व्यवस्थेची वर्णने येतात. दृ.क्र. ५३, ५४, ५९, ८२, ८३, ८४ इत्यादी दृष्टांतातून तत्कालीन कुटुंबजीवनाचे चित्र स्पष्ट होते. दृ. ५३ मध्ये कुष्ठाने ग्रासलेला व्यापारी व त्याचे इतर आप्तसंबंधी लोक त्याच्याशी कसे वागतात, हे स्पष्ट होते. कुटुंबातील अनेक कर्ते पुरुष व्यापारासाठी परगावी जात असले पाहिजेत, असे दृ. ८७ वरून आढळते. पती-पत्नीचे संबंध हा कौटुंबिक जिव्हाळ्याचा विषय असतो. दृष्टांतपाठातील पुढील काही दृष्टांतातून या नात्यावर प्रकाश पडतो.

"आधारीये परीसाचा दृष्टांत" (क्र.५४) यात एका शेतकरी कुटुंबाचे सारे तर पति-पत्नीचेच चित्रण येते. घरातील स्त्री किती आदरातिथ्याने वागते ते येथे दिसते. तर रागावलेला नवरा तिला "पपिणी पपिणी कवणासि बीढार दीधले" असे म्हणून रागावतो. पत्नी त्याची समजूत घालते. पत्नीच्या चारित्र्याकडे संशयाने पाहण्याची वृत्ती दृ.५९ मध्ये दिसते. त्यावेळी कुटुंबातील ही स्त्री सोशिकपणे ते सारे सहन करते. दृ. ८२ त असेच चित्र आढळते. अनेकवेळा एका पत्नीला सोडून दुसरी करण्याची वृत्ती असल्याचेही आढळते. "द्विभार्याचा दृष्टांत" (क्र.९३) अशी प्रवृत्ती स्पष्ट झालेली आहे. एखाद्यावेळेस भांडणामुळे अथवा इतर कारणामुळे त्याग केलेल्या पत्नीचा स्विकार करून पुन: संसार थाटला जात असे याचे चित्रण दृ. ८४ त आढळते. अशा विविध पातळीवरून तत्कालीन समाजातील कौटुंबिक जीवन आपणापुढे येते. काही प्रमाणात वरील प्रकारे या कौटुंबिक जीवनाचे चित्र त्यातून उभे राहते. त्यावरून संपूर्ण चित्रणाचे अनुमान आपणास करता येते.

इ) स्त्री जीवनाचे स्वरूप:

श्रीचक्रधरस्वामींनी स्वत:च्या तत्त्वप्रतिपादना करिता विविध प्रकारचे दृष्टान्त योजले आहेत. स्त्री व तिच्या मनाची भावावस्था हीदेखील चक्रधरांनी स्वत:च्या तत्त्वाच्या स्पष्टीकरणार्थ लक्षात घेतली. त्यामुळे स्त्रीविषयक जवळ जवळ १६-१७ दृष्टांत आपणांस आढळतात. या दृष्टांतातील अनुभवांचा हा एक प्रधान विशेष आहे असे सांगून रा.शं. नगरकर[१९] त्याबाबत म्हणतात की, "यातील अनेकांत स्त्री हृदयातील भाव-भावनांचा आश्रय घेतलेला आहे. स्त्री ही मानवी जीवनातील शक्ति असल्यामुळे जगातील अनेक थोर चिंतकांनी, साक्षात्कारी स्त्री-पुरुषांनी आणि कलावंतांनी स्त्री हृदयातील आवेगयुक्त भावांच्या माध्यमातून आपल्या प्रतिभेला वाट करून दिली आहे. चक्रधरस्वामीं-च्या या दृष्टांताच्या बाबतीतही हेच सत्य जाणवते."

चक्रधरांनी अशा अनेक प्रकारे स्वत:च्या तत्त्वविचाराला प्रकट केलेले आढळते. तत्त्वज्ञानाच्या स्पष्टीकरणार्थ त्यांनी स्त्रियांच्या भावनांचा आधारही घेतला असेल. पण त्यातून केवळ तत्त्वविचाराचेच स्पष्टीकरणे होते असे नाही तर तत्कालीन स्त्री मनाची जाणीवही बोलकी होते. दृष्टांता-मधून एक सुंदर स्त्री-सृष्टी सजीव झाली आहे. स्त्री विषयीची एकेक प्रतिमा अखिल स्त्री जातीचा मनोज्ञ पैलू व्यक्त करणारी आहे." यादव काळात धर्मसंस्थेचे वर्चस्व होते. त्यामुळे या काळात स्त्रियांना समाजात मानमान्यता फारशी नव्हती. उलट स्त्री जीवन हे काहिसे अगतिक व दडपलेल्या स्वरूपाचेच होते. ते विशिष्ट अशा चाकोरीतच रूतलेले होते. संसार, घर-दार हेच या स्त्रियांचे सर्वस्व होते. त्यामुळे दृष्टांतपाठात स्त्रियांच्या संबंधात जे दृष्टांत आले आहेत ते विविधांगी असले तरी एका मर्यादितील आहेत. क्वचित काही वर्णनातून बंडखोर स्त्री मनाची जाणीव स्पष्ट होते.

स्त्रीच्या जीवनात मातृत्त्वाचे विशेष महत्त्व असते. माता आणि तिचे अपत्य यांचा उल्लेख असलेले दृष्टांत म्हणजे "दूरस्थमाता" (दृ. ३८) लेकुरवाळीमाता (दृ.९८) हे होत. यातून मातृत्त्वाचे ओझे असलेली स्त्री उभी राहते. अनेकवेळा या मातांना स्वत:च काबाडकष्ट करून पोट भरावे लागत असे. "दूरस्थमाता" या दृष्टांतात स्त्री च्या या कष्टमय जीवनाचे चित्र येते.

पति देव मानून स्त्रीने कुटुंबासाठी झिजावे. हा स्त्री जीवनाचा तत्कालीन आदर्श आहे. पतीच्या आज्ञेत राहणे व तो सांगेल तसेच वागणे ही स्त्री मनाची भूमिका दृ. क्र. ५९, ८२, ८३, ८४ व ८५ त आढळते. एखाद्याला स्वत:ची पत्नी आवडली नाही. अथवा पति-पत्नीत दुरावा निर्माण झाल्यास दुसरी पत्नी करता येत होती. त्यावरून आवडती-नावडती असा फरक केला जाई. (दृ. ८३). ८४ दृष्टांतात पतिने टाकलेल्या दुर्भागी स्त्रीची अवस्था आपणापुढे उभी राहते. पतिनिष्ठा हीच जीवननिष्ठा असे मानून जगणारी स्त्री "शास्त्रापालना"च्या दृष्टांतात भेटते. (दृ.क्र. ८५) पतिच्या विरहाने व्याकुळ होणारी पत्नी व तिचे स्वरूपही विरहीणीच्या दृष्टांतात आढळते. (दृ.क्र. ८७, ८८, ८९).

पूर्वीच्या काळी बालविवाहाची प्रथा होती. त्यामुळे अनेकवेळा काही स्त्रियांना बालपणातच वैधव्याला सामोरे जावे लागे. "बालविधवेच्या दृष्टांतात" हे दु:ख आढळते व या सामाजिक रूढीचा आविष्कारही आढळतो. अनेकवेळा स्त्रियांना "दासी" (दृ.क्र. ६२) म्हणूनही राबावे लागे. पण मालकिणीच्या सांगण्याप्रमाणे वागणाऱ्या अशा स्त्रियांना आपुलकिने वागवले जात असे. या सर्व दृष्टांतात स्त्री जीवनाच्या वेगळेपणावर प्रकाश टाकणारा "दीक्षित कन्ये"चा दृष्टांत अत्यंत महत्त्वाचा मानावा लागतो. तत्कालीन समाजात एखाद्या उच्च कुळातील स्त्रीने जातिबाह्य पुरूषाशी "परवात" करणे

ही निश्चित बंडखोरी ठरते. दीक्षित कन्येने कोळ्याशी संबंध ठेवून तत्कालीन समाजातील रूढी-परंपरेला धक्का दिलेला आहे. अशा स्त्रीचा माता-पित्याकडून अथवा स्वकुटुंबातील इतर व्यक्तिकडून त्याग केला जात असे. व घरादाराच्या संबंधातील इतर कोणतेही अधिकार अथवा हक्क अशा स्त्रीस मिळत नसत. एखादी म्हातारी (दृ.क्र.९१) दळण-कांडण करून जगताना आढळते. तत्कालीन समाजत वेश्यांचा ही वावर होता. समाजात वावरत असलेल्या "सामान्य स्त्री"चे जीवनही दृ.क्र. ९१ त आढळते. अशा सामान्य स्त्री ने अथवा वेश्येने एकाच पुरुषाबरोबर निष्ठेने राहण्याचे ठरविले तर ती तशी राहू शकत असे. चक्रधरस्वामीच्या तत्त्वानुसार अशी स्त्री देखील प्रतिव्रता म्हणूनच ओळखली जाते.

अनेक दृष्टांतातून स्त्रीच्या मातृस्वरूपाचे दर्शन आपणास घडते. मुलाच्या खाण्या-पिण्याची, दुखण्याची, शुश्रुषेची काळजी घेणा-या मातृहृदयाची दृश्ये अनेक आहेत. पुत्र वियोगाने व्यथित झालेली अहिर देशातील म्हातारी दु:खाद स्मृतींमुळे देशांतर करते. अशी स्त्री जीवनाची विविध रूपे या दृष्टांतातून येतात. या सर्व दृष्टांतातील स्त्री च्या अंतरंगाची विविधता पाहिली तर त्यात बंडखोर प्रेयसी पतिनिष्ठा, गृहिणी, वत्सल माता, व्यथित विरहिणी , परित्यक्ता अशा अनेक स्त्रिया येतात. या सर्वांतून १३ व्या शतकातील स्त्रियांची जीवन जगण्याची वृत्ती-प्रवृत्ती आपणास दिसते.

यादवकालीन समाजात घर अथवा कुटुंबा यातच स्त्रीचे स्थान आढळून येते. पति-पत्नी व माता-बालकाचे नातेच यात जास्त येते. [२१] या दोनही नात्यांतील प्रेम, अनिवार ओढ, उत्कटता ही सनातन आहे. इतर नात्यांचे चित्रण जास्त प्रमाणात येत नाही. भाऊ-बहिण किंवा सासू-सून असे स्वतंत्र दृष्टान्तातून येत नाही. तसेच या स्त्रियांच्या आनंदाचे क्षण, त्यांचे अलंकार यांचेही चित्रण या दृष्टांतून आलेले नाही. तरीपण तत्कालीन

समाजात एकंदर स्त्री-जीवनाचे स्वरूप कसे होते. स्त्रियांची अवस्था कशी होती हे समजून येण्यास पुष्कळ मदत होते.

३) संसारोपयोगी वस्तु, अन्नपदार्थ आणि वस्त्रे:

स्त्री जीवन व कौटुंबिक जीवन याच्याशी अगदी जवळचे नाते संसारोपयोगी वस्तुंचे असते. सामान्य माणसांच्या नित्य उपयोगात येणाऱ्या वस्तुतून, अन्न पदार्थांच्या स्वरूपातूनही त्या समाज जीवनाचे आणखी व्यापक चित्र आपणांपुढे साकार होते. त्यातील काही वस्तु घरगुती, नित्याच्या वापरातील आहेत तर काही व्यापारासाठी उपयोगात येणाऱ्या वस्तु आहेत. संसारोपयोगी वस्तुत वेव (दृ.११), वर्ते (दृ.९२), सुरी (दृ.४०), मुसळ-सूप (दृ.४३), रहाटघडी (दृ. १२), मोहळे अथवा कणगी (दृ. ४६), वाटुळी (दृ. ६४), मडके-वाळो (दृ. ५३), पीढे (दृ. ५४), याबरोबरच बोरी-वेळू-टाकळी इत्यादी झाडांचा वापरही केला जात होता. (दृ. ४०) नांगर (दृ. २८), तेणे (दृ. ४१), विळा इत्यादी शेतीच्या कामासाठी लागणाऱ्या वस्तुंचा वापर सरपडी केला जात असे. तांबे घडविण्याचे अथवा त्यापासून तयार केलेली भांडी वापरात होती. (दृ. ७), समुद्रातील प्रवासासाठी जहाजाचा वापर केला जात होता. (दृ.८), हिरे, माणिक, मोती या वस्तुंचा वापर व्यापारासाठी होत असे. पाणीचोर यंत्रही (दृ.७०) त्यावेळी उपयोगात होते. घरांना उंबरा असे. (दृ. १, २, ३) मध्ये हा उल्लेख येतो. सुरी (दृ. ४०) आणि खड्ग ही शस्त्रे लोक जवळ बाळगीत असावेत असे चित्र दृष्टांतातून येते. या सर्व वस्तुंच्या उल्लेखातून समाजजीवनाचे स्वरूप आकलन होते.

स्त्रियांना घर-संसारात महत्त्व होते. त्यांच्या नित्याच्या कामाचा व्याप म्हणजे स्वयंपाक करणे अथवा विविध खाद्य पदार्थ तयार करणे. दृष्टांतपाठातून तत्कालीन घरगुती जीवनात, तसेच रोजच्या जेवणात

उपयोगात येणाऱ्या विविध खाद्य पदार्थांची नावे येतात. त्यात, तूप-भात (दृ.२५), दूध-भात (दृ. २५), गूळ (दृ. ६७), फुटाणे (दृ.६६), खाजा (दृ. २१), लोणचे-कोशिंबीर (दृ. ३४), शोळ्याचे शिखडे व लोणी ( (दृ. ५४), मठूरी किंवा मोहरी (दृ. १३) या खाद्य पदार्थांचे उल्लेख लक्षणीय मानावे लागतील. साधारणत: सर्वसामान्य माणसांच्या रोजच्या आहारात असणाऱ्या पदार्थांचे वर्णन येते. मिष्ठान्न अथवा पक्वान्नाचे चित्रण दृष्टांतपाठात आढळत नाही. वाळूक (दृ.३२,३३,३४) खाण्यासाठी वापरले जात असते. त्याचा उल्लेख महत्त्वाचा मानावा लागेल. या बरोबरच "चांदवोयाच्या" दृष्टांतात (क्र.४२) आंबे-केळे-नारळ या फळांचे नामोल्लेख येतात. यावरून अशा विविध पदार्थांचा व फळांचा वापर यादवकालीन समाजत केला जात असावा. अन्न-धान्न-सुगी, सुगीचा हंगाम याचे वर्णन मात्र येत नाही. तरी पण सर्वसाधारणपणे विविध स्वरूपांचे पदार्थ, त्यांचे प्रकार समाजात प्रचलीत होते.

नित्याच्या वापरातील वस्तु व खाद्यपदार्थांचे स्वरूप लक्षात घेतल्या-नंतर तत्कालीन लोकांची वस्त्रे व त्यांचे स्वरूपही ध्यानात घ्यावे लागते. त्यात जीर्णवस्त्र तसेच कांबळेयाची "कुंधी (दृ.१३) हे पांघरण्याचे कपडे म्हणून वापरले जात. चांगल्या प्रकारची वस्त्रे म्हणून पाटाऊ-सुताऊवे (दृ. ८४) ची वस्त्रे होती. ती विशिष्ट कार्यात उपयोगात येत. मालगांठी (दृ. ५७) म्हणजे अत्यंत किंमती वस्त्रे अथवा रेशमाची वस्त्रेही काही लोक वापरत. पुरुषांचा वेष म्हणजे आंगी-टोपरे (दृ. ८७) असा असल्याचे आढळते. दृ. १०९ मध्ये उखारलेले म्हणजेच खारावलेले वस्त्र म्हणून एक प्रकार आढळतो. ते अत्यंत स्वच्छ असे. वस्त्रे धुण्याच्या प्रकारही यावरून कळून येतो. खार घातलेल्या पाण्यात वस्त्रे धुतल्यावर इतकी स्वच्छ दिसत दिसत की, "मग डोळेयाचा मळ लागे ऐसे होए" अशा विविध स्वरूपातुन वस्त्रांचा उपयोग व त्यांचा वापर त्याकाळी कसा केला

जात होता याचे चित्र आपणासमोर येते. या सर्व वस्तु, पदार्थ अथवा वस्त्र यांचे उल्लेख पाहिले असता प्राचीन काळातील जीवनमानही कळते. सर्व सामान्यांचे जीवन त्यातून उभे राहते. साधी राहणी, स्वच्छतेची आवड असेच हे दर्शन आहे. साधेपणा हा या काळातील लोकांच्या जीवनातील प्रधान भाग ठरलेला दिसतो.

य) मनुष्य स्वभावाचे चित्रण:

अनेक व्यक्तींचा समाज तयार झालेला असतो. भिन्न भिन्न व्यक्ती व त्यांच्या भिन्न भिन्न प्रवृत्ती अनेकवेळा समाजात आढळतात. इतकेच नव्हे तर कधी कधी व्यक्तींच्या प्रवृत्तीचा समाज जीवनावर प्रभावही पडलेला आढळतो. तसेच समाजात वावरणाऱ्या विविध व्यक्तींच्या वृत्तीप्रवृत्ती दर्शन अथवा चित्रण कलाकृतीतूनही पडत असते. साहित्य कला ही समाज-सापेक्षा असल्याने अशा विविध व्यक्तींचे स्वभाव दर्शनही शब्दांकित झालेले असते. दृष्टांतपाठातूनही पुढील काहीसे तत्कालीन समाजातील मनुष्य-स्वभावाचे चित्रण आपणापुढे सहजतेने साकारते. "बांदकरी", "साळिमातला", "माळेकार", "दीक्षित कन्या", "झसाळू", "पतिव्रता", "सिंदेराणो", "रिणाईत", "शरणागत", "घेईला", "जागसुता" अशा विविध दृष्टांतातून तत्कालीन मनुष्य स्वभावावर प्रकाश पडतो. डॉ. यू.म. पठाणांच्या[२२] मते हे दृष्टांत म्हणजे मनुष्य स्वभावाचे विविध नमुनेच होत.

वरील अनेक दृष्टांतातून तत्कालीन समाजात वावरणाऱ्या माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तीवर प्रकाश पडतो. त्यातही बांदकरी, दीक्षितकन्या, झसाळू, घेईला, जागसुता या सारख्या दृष्टांतातून मानवी स्वभावाची वेगळी रूपे आपणापुढे उभी राहतात. बंदकरी च्या दृष्टांतातून सामाजिक गुलामगिरी, तर दीक्षितकन्येच्या प्रवृत्तीतून बंडखोरी आढळते. झसाळू वा घेईला यातून विकृतीचे चित्रच उभे राहते तर जागसुताच्या दृष्टांतातून आळशी लोक कसे

वागतात व वावरतात याचे स्वरूप समजते . या सर्व गोष्टी सामाजिकतेशीच निगडीत आहेत. विविध मानवी स्वभावाच्या या दृष्टांतातून चक्रधरस्वामींनी तत्कालीन समाजजीवनाचे किती सूक्ष्मतेने अवलोकन केले होते याचीही कल्पना येते.

र) धार्मिक जीवन:

मध्ययुगीन कालखंडात धर्म विचाराला व आचरणाला अत्यंत महत्त्व होते. कारण तत्कालीन समाजात मानवी विचार आचार, ध्येयकल्पना, व्यक्तिजीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण ह्याचे नियमन करणारी धर्म व धार्मिक तत्त्वज्ञान ही एक प्रमुख शक्ती होती. त्यामुळे तत्कालीन समाज जीवन धर्म विचाराने प्रभावित झालेले दिसते.[२३] बोरगावकरांचे हे विचार तत्कालीन धर्माने ग्रासलेल्या समाज जीवनाच्या आधारेच आलेले आहेत. दृष्टांतपाठातील दृष्टांतातूनही ही धर्म संकल्पनेची छाप प्रभावीपणे दिसते. "दीक्षित कन्येचा" दृष्टांत हा या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानावा लागेल. केवळ जातिबाह्य पुरुषाशी "वरवात" केल्याने याकन्येस तत्कालीन धार्मिक रिवाजानुसार बेताल ठरविली. तिचे सर्व हक्क नाकारले गेले. धार्मिक जीवनाचे हे चित्रण "कर्मचांडाळा"च्या दृष्टांतातूनही येते. तत्कालीन समाज जीवनात धार्मिक कार्ये, कर्म, विधी यांना चालना देण्यात आली होती. त्यातून अयोग्य स्वरूपाची कर्मे करण्याचीवृत्ती बळावलेली होती. ते लक्षात घेऊन चक्रधरस्वामींनी अशी हीन कर्मे करणाऱ्यांवर टीका तर केलीच पण अशी हीन कर्मे करणाऱ्यापेक्षा जातीने हीन असलेला चांगला असा एक महत्त्वपूर्ण विचार मांडला आहे. हा विचार तत्कालीन समाज जीवनाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा मानावा लागेल. या सर्वांतून तत्कालीन धर्म व्यवस्थेचे, जाती व्यवस्थेचे व त्यातून निर्माण झालेल्या विषम समाज जीवनाचे चित्रच चित्रच आपणांपुढे उभे राहते.

धार्मिक जीवनात देवता, देवतेची पूजाअर्चा यांसारख्या गोष्टींना स्थान असते. "कठियाचा दृष्टांत" (क्र. ९४) हा या दृष्टीने त्यावेळच्या कर्मठ वृत्ती-प्रवृत्तीचे स्वरूप दाखवून देतो. "गुरवा"ला अष्टौप्रहर देवतेची पूजा करावी लागत असे. अनेक वेळा हे गुरव एकटे असत. गावातील लोकांकडून भिक्षा आणणे व त्यावर उदर-निर्वाह चालविणे, हे यांचे काम. कधी कधी स्त्रियाही या कामात लक्ष देत असत. हे या दृष्टांतातून स्पष्ट होते. मूर्तीपूजा व तिचे महत्त्व या समाजात असल्याचेही आढळून येते. "किर्तीकठिया"च्या दृष्टांतातही अशीच धार्मिकतेची भावना, मंदिराची देखभाल करणारा गुरव व त्याचा जीवनक्रम येतो. मूर्तीपूजेप्रमाणे पुराण सांगणे व पुराण ऐकने हे ही एक धार्मिक कार्य म्हणून पाहिले जायचे. वयोवृध्द-म्हातारे लोक फावल्या वेळेत पुराण ऐकण्याचे धार्मिक कार्य म्हणूनच पार पाडीत. दान-धर्म करणे हे सुध्दा धार्मिक जीवनाचेच अंग आहे. "व्यतीपाता"च्या दृष्टांतात याचा उल्लेख येतो. कोणी व्यापारी अथवा राजा महाद्वारात ब्राम्हणांना पर्वकाळी दान देत असे. अशा विविध दृष्टांतातून मध्ययुगीन धार्मिक जीवनाचे स्वरूप आपणापुढे उभे राहते. मंदिरांची देखभाल करणे, पुराण ऐकणे, पुराण सांगणे, पर्वकाळी दानधर्म करणे अशा विविध कृत्यांचा धार्मिक विधीत समावेश होत होता. या धार्मिक विधींच्या पूर्ततेसाठी जनतेला अत्यंत त्रास सहन करावा लागे. पुण्यप्राप्ती तसेच मोक्षप्राप्तीची प्रलोभने या विधींच्या मागे होती. त्यातूनच अंधश्रध्दा वाढत गेल्याचे आढळते. १३ व १४ व्या शतकात वेगवेगळ्या देवदेवतांची उपासना, व्रते यांची निर्मितीही याच धर्मांधतेच्या भावनेतून उगम पावली व नंतरचा सर्वच समाज या धर्मभावनेत ओढला गेला.

ल) कला व क्रीडा:

धर्म भावनेची पकड जसजशी समाजावर घट्ट होत गेली. तस तसा

मध्ययुगीन समाज अंधश्रद्धेत अथवा त्यासारख्या धर्मभावनेत बांधला गेला. परिणामत: धर्मा व्यतिरिक्त जीवनात इतर काही कर्तव्ये असतात याची जाणीवच या काळातील लोक विसरून गेले. त्याचा एक परिणाम असा झाला की हा समाज दुबळा व दैववादी बनला. त्यामुळे अस्मानी सुलतानी सारखी संकटे येऊनही त्याविरुद्ध प्रतिकार न करता हे लोक जमेल तसे जगत राहिले. धार्मिक वर्चस्व, अस्मानी सुलतानी सारख्या संकटामुळे या काळातील जनजीवन अत्यंत हाचलेले, सावधुधे बनले. परकीय आक्रमणांमुळे सर्व समाज असुरक्षित बनला होता. अशा वातावरणात कला व क्रीडांची जोपासना होणे अवघड होते. तरी देखील त्या काळातील सर्व सामान्य माणसांनी स्वत:च्या कला जोपासण्याचा प्रयत्न केलेला आढळतो.

पुढील काही दृष्टांतातील वर्णनातून तत्कालीन कलांचे खेळांचे स्वरूप आपणांपुढे उभे राहते. दृ. १६ त गायकांचा आणि भाटांचा उल्लेख येतो. त्यावरून गायन कलेचे महत्त्व विशद होते. दोरीवरून अथवा तलवारीच्या धारेवरून चालण्याची कसरत करणारे कोल्हाटी अथवा डोंबारी स्त्री-पुरुषांचे वर्णन दृ.क्र. ९२-९३ मध्ये आढळते. या लोकांनी स्वत:ची कला स्वत:च्या उपजीविकेसाठी उपयोगात आणली. या वरून या कलांचे अस्तित्व कशा प्रकारे अबाधित राहिले हे समजते. दृ.क्र. १०८ मध्ये पडद्याआडून दिसणाऱ्या सोंगांचा उल्लेख येतो. तो छायानाटयाच्या स्वरूपाशी निगडीत आहे. छायानाटयात नटांच्या हालचाली पडद्यातून केवळ छायांच्या रूपाने दिसतात. अशा प्रकारची छायानाटये यादवकाळात विशेष प्रचारात असावी. तसेच हारीहुरी फळे वाटावीत अशा प्रकारे मातीची रंगीत फळे बनविण्याची कला त्यावेळी लोकांना अवगत होती. (दृ.क्र. ४२) अशा विविध प्रकारच्या कलांचे व खेळांचे वर्णन दृष्टांतातून येते. क्वचित प्रसंगी मल्लविद्येसारख्या खेळाचेही चित्रण येते. सामाजिक

जीवनमानाप्रमाणे या कलांतील साधेपणा समोर येतो. पण त्याचबरोबर त्यातील कलात्मकताही अगदी सहजतेने या दृष्टांतातून अभिव्यक्त होते.

व) सांस्कृतिक जीवन:

कोणत्याही प्रगतिशील समाजाचे सांस्कृतिक जीवनमान हे त्या समाजाचे एक वैशिष्ट्य असते. कला-क्रिडांचा विकास, सामान्यांचा त्यातील सहभाग, जनतेच्या सर्व-होदाचे एक वेगळेच चित्र त्यातून उभे राहत असते. त्यामुळे सांस्कृतिक जीवन हे त्या समाजाचे अविभाज्य अंग बनलेले असते. प्राचीन काळापासून आपल्या समाजातील सांस्कृतिक घटकांशी निगडीत असे जीवन येथील सर्वसामान्य माणूस जगत आला. त्यामुळे सांस्कृतिक घटकांचा अथवा जीवनाचा विकास येथे सातत्याने घडत आला. सण-वार, उत्सव, विविध होळ, रुढी-परंपरा, चाली-रीती, देवाण-घेवाण, अशा सर्व स्तरांतून हे जीवन फुललेले, विकसित झालेले आढळते.

यादवकाळ हा तर आपल्या समाजातील सांस्कृतिक जीवनाच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानावा लागतो. परंतु याच यादव राजवटीत हे जीवन काहीसे अडखळलेले वाटते. विशेषत: मध्ययुगीन काळात व त्यातही १३-१४ व्या शतकात मात्र या सांस्कृतिक जीवनाचा फारसा विकास झालेला आढळत नाही. स्मृतिस्थळ अथवा दृष्टांतपाठातून जे चित्र आपणापुढे येते ते अत्यंत अपूर्ण व त्रोटक स्वरुपाचे येते. विशेष असे की सण-उत्सव ही आपल्या समाजजीवनाची सांस्कृतिक अंगे म्हणून ओळखिली जातात. पण या दोनही ग्रंथात सणांचा अथवा इतर उत्साहवर्धक गोष्टींचे चित्रण येत नाही. हे लक्षात घ्यावे. लागते. तत्कालीन समाजातील सांस्कृतिक जीवनाचे स्वरुप दृष्टांतपाठातील काही दृष्टांतातून चित्रित झालेले दिसते. वर आलेले कला व होळांचे स्वरुप हे तत्कालीन समाज जीवनाचे एक अंगच मानावे लागते. सांस्कृतिक जीवन दर्शनाच्या दृष्टीने "बांदकरीयाचा दृष्टांत" (क्र.१६) हा

महत्त्वाचा मानावा लागेल. कारण कलावंत, गुलाम, राजा, पंचनगरे, सा सामान्य स्त्रिया, या सर्व घटकांचे स्वरूप आपणांस या दृष्टांतातून दिसते. "कोलाचा दृष्टांत" (क्र. ५८) यातून आचार्य अथवा गुरु व शिष्य यांच्या संबंधावर प्रकाश पडतो. तसेच पट्टयाचा सराव कसा दिला जात असे तेही आढळते. या बरोबर शिक्षा देण्याचा प्रकारही यातून कळून येतो. माणसामाणसातील वैरभावही "दंदीयाचा दृष्टांता"त स्पष्ट होतो. भांडण अथवा द्वंद्व झाल्यास बदला घेण्याची वृत्तीही आढळते. राजा कधी कधी घोड्यावरून शिकारीस जात असे. (दृ.क्र.७७). शेळ्या-मेंढयांनी रोपटे तुडवले जाऊ नये म्हणून त्याभोवती काटेरी कुंपण करण्याची रीत होती. वटरोपाच्या दृष्टांतातून हे वृक्षासंवर्धनाचे स्वरूप आपणापुढे उभे राहते.

मध्ययुगीन समाजात बालविवाहाची प्रथा रूढ होती. "बाल विधवेच्या" दृष्टांतात हे वर्णन आढळते. मुला-मुलींचे विवाह लावून देण्याची प्रथा देखील महत्त्वाची मानावी लागेल. विवाह हे सांस्कृतिक जीवनाचे, समारंभाचे एक अंगच असल्याने विवाहाचे उल्लेख महत्त्वपूर्ण आहेत. (दृ. १३ व ९७). जात-चांडाळ (दृ. ४८), तसेच चोरास शिक्षा देणे. (दृ१३) या सारख्या काही दृष्टांतातून तत्कालीन सामाजिक जीवनाचे सांस्कृतिक स्वरूप अधिकच व्यापक व प्रभावीपणे स्पष्ट झालेले आहे. माच्यावर उभे राहून शेतीची राखण करणारा "माळेकर" यातून (दृ. ५०) सांस्कृतिक जीवनाचे स्वरूप प्रकट होते. अशा विविधतेत वेगवेगळ्या विद्यांचे उल्लेखही समाविष्ट होतात. उध्वरेतविद्या, तसेच दूरदृश्याचा दृष्टांत यातून सामान्य अपरोक्ष व विशेष ज्ञानाचे विवेचन येते. (दृ. १०२) स्वप्न व त्यावरील विश्वास, त्यातील खरे-खोटेपणा याचेही स्वरूप दृ.क्र. १०४ मध्ये येते. ही अंधश्रध्दा तत्कालीन समाजातील दैववादाचे स्वरूपच स्पष्ट करते. "सारी पाटाचा" खेळ व तसेच पर्वकाळी दान-धर्म करण्याचे (दृ.५७) कार्यही सांस्कृतिक

जीवनाचेच द्योतक मानावे लागतील. अशा विविधतेतून तत्कालीन समाजातील सांस्कृतीक जीवनाचे अंग विकसित झालेले आढळते. लोकांच्या मनोरंजनासाठी कळसूत्री बाहुल्यांचे खेळ आणि छायाचित्रे दाखविण्याचे कार्यक्रम होत. गारुड्यांच्या कसरतीसारखेच कोल्हाटयांचे नाच रस्तोरस्ती रंगत होते. मातीची फळे बनविणे हे यादवोयाच्या दृष्टांतात येते. त्याच प्रमाणे लाकडी हत्ती, घोड, बैल अशी खेळणी लहान मुलांसाठी बनविली जात असे. थोडक्यात अशा विविध स्वरुपातून हा विकास घडून आलेला होता. दृष्टान्तपाठामधून यादवकालीन समाजातील सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ आपणांसमोर येतात. त्यांचे वर्णन थोडक्यात आलेले असले तरी त्यावरुन सामाजिकतेचे वेगळेपण लक्षात येण्यास मदत होते.

घ) आजार, व्याधी व औषधे:

दृष्टांतपाठातून यादवकालीन समाजाचे विविधांगी दर्शन आपणांस घडते. १३व्या १४व्या शतकातील यादवकालखंड हा अनेक जीवघेण्या आपत्तींनी ग्रासलेला होता. परचक्र, दुष्काळ, चोरी-दरोडेखोरी, अशा विविध संकटांना तोंड देत हे लोक जगत होते. या लोकांच्या या सार्वजनिक अथवा सामुदायिक दु:खांप्रमाणे काही व्यक्तिगत स्वरुपाचे त्रास, आजार, व्याधीही होते. दृष्टांताच्या चित्रणातून हे व्यक्तिगत जीवनाचे दु:खही येते. मात्र समाज अशा दु:खांना अथवा व्याधिग्रस्त लोकांना कशाप्रकारे पहात याचे स्वरुप त्यातून कळते. यापैकी "कुष्टीयाचा दृष्टांता"त (क्र. ५३) कुष्ट झालेल्या व्यक्तीचे जीवन व त्याकडे इतर समाज, नातेवाईक व संबंधित व्यक्ती त्याच्याशी कशा वागतात याचे चित्रण येते. अशा रोगी माणसाची व्यवस्था कुठेतरी देवळात अथवा मंदिरात केली जाई. "वज्रकीटकीयेचा दृष्टांत" (क्र. २०) यातून पोटदुखीचे व तशा प्रकारच्या व्याधीचे स्वरुप समजते. अशा व्याधीबाबत माहितीच्या व्यक्तीकडूनच उपचार करुन घ्यावे लागत. अज्ञानी व्यक्तीने औषध दिल्यास अथवा उपचार केल्यास उपयोग होत नसल्याचा यातील

उल्लेख महत्त्वपूर्ण मानावा लागेल. "हीरडेया-बेहडेयाचा दृष्टांत" हा देखील औषधोपचार-व्याधी यादृष्टीने महत्त्वाचा आहे. मुलाला भूक लागत नाही म्हणून एक माता आपल्या मुलाला या वनस्पतींचा रस अथवा फुटका देते. यावरून आयुर्वेदिक औषधोपचार, झाड-पाल्याची औषधे व त्यांचे उपयोग मध्ययुगीन समाजात रूढ असल्याचे समजते. आयुर्वेदिक औषधांची परंपरा आपल्या समाजात दृढमूल होती. अशा विविध स्वरूपातून व्याधी व त्यावरील औषोपचाराचे चित्र दृष्टांतातून उभे राहते.

क) वाक्प्रचार व वाक्यप्रयोग:

भाषा व समाज यांचे नाते अत्यंत अतुट असे आहे. भाषिक आविष्कारातूनही अनेकवेळा ज्या त्या समाजाचे स्वरूप व चित्र स्पष्ट होत असते. शब्दप्रयोग, वाक्प्रचार यातूनही समाजजीवनाचे आगळे-वेगळे दर्शन घडत असते. दृष्टांत पाठातून जे वाक्प्रचार व शब्दप्रयोग येतात त्यातूनही यादवकालीन समाजजीवनाचे चित्र शब्दांकित होते. त्यादृष्टीने दृ.क्र.१३ यातील "विडा देणे", "विडा घेणे" यासारख्या प्रथा समाजात रूढ असल्याचे दिसते. "दीक्षित कन्ये"च्या दृष्टांतातील "परधात" या शब्दप्रयोगातून स्त्री-पुरुष संबंधाचे चित्र उभे राहते. या शब्दप्रयोगाप्रमाणेच "जातचांडाळ" कर्मचांडाळ", "जात्यांध", "हातु हातु घडवी", "खांड गुड नुरे" यासारख्या शब्दप्रयोगातून तत्कालीन समाजातील लोकांच्या जगण्याचे-वागण्याचे चित्रच स्पष्ट होते. समाजात रूढ असलेल्या वृत्ती-प्रवृत्तीच या शब्दप्रयोगातून स्पष्ट होतात. दृष्टांतपाठातून येणारे हे शब्दप्रयोग व वाक्प्रचार समाजजीवनाच्या चित्रणासाठी महत्त्वपूर्ण मानावे लागेल. यादवकाळात महानुभावीयांचे जे वाङ्‌मय निर्माण झाले ते भाषिकदृष्ट्या समृध्द होते. सामाजिक घडामोडीचे जीवनाचे यथार्थ दर्शन चित्रित करणे अथवा रेखाटने

त्यामुळेच सत्यसाध्य झाले आहे. दृष्टांतपाठातील पुढील वाक्प्रचारही या दृष्टीने मोलाचे आहेत. आडी घालणे, हांडी गावो पुजणे (दृ. १३), होरी जुंपणे (दृ. १३), "आडवांगी घालणे", (दृ.४०), पाठीसी घालणे (दृ.१०२) सुरीवर येणे (दृ.७४) या सारखे अनेक वाक्प्रचार हे सामाजिकतेचे चित्रच स्पष्ट करतात. लोकांच्या बोलीभाषेतून येणारे हे वाक्प्रचार केवळ भाषिक वैभव नव्हे तर तत्कालीन समाजाचेही ते एक लेणे मानावे लागेल.

भ) पशु-पक्षांची सृष्टी:

स्वत:च्या तत्त्व विचाराच्या प्रतिपादनासाठी चक्रधर स्वामींनी वेगवेगळे दाखले अथवा दृष्टांत दिले. त्यांच्या या दृष्टांतातून पशु-पक्षांचे उल्लेख वारंवार येतात. त्यातील काही निसर्गात आढळणारे वावरणारे असे आहेत. तर काही पाळीव प्राणीही आहेत. या सर्वांतून या सृष्टीचा साक्षात्कार होतो पण त्याबरोबरच ग्राम जीवनाचाही आविष्कार नकळतपणे घडतो. ही पशु-पक्षांची सृष्टी सर्व-सामान्य जनतेच्या परिचयातील आहे. किंवा ती तशी असल्यानेच दृष्टांतात त्यांचा उपयोग केला गेला. कुकडी, मासळी, हत्ती, गाय, वानरी, पाडळिये, "सुने" अथवा कुत्रे ही सर्व सृष्टी सामान्यांच्या परिचयातील. इतकेच काय पण यातील तरंग अथवा घोडा, गाय, कुकडी, सुने, हे प्राणी तर नित्याच्या उपयोगात असलेले पाळीव प्राणी म्हणून आढळून येतात. ग्राम जीवनाचेच हे आगवेगळे चित्र मानावे लागते कारण तत्कालीन ग्राम जीवन हे शेती निष्ठच आहे. अशा शेतकऱ्यांच्या घरात ही ""जित्राब" महत्त्वाची असतात. त्यादृष्टीने ग्रामजीवनाचे हे एक विशेष स्वरूप म्हणूनही या पाळीव प्राण्यांची दखल येथे घ्यावी लागते. "तनयेल वावर", "कुडाची झोपडी","पानपुडा", "बटवा","जळमांडवी" यातूनही ग्रामजीवनाचे दर्शन आपणांस घडते. पशु-पक्षांच्या सृष्टीबरोबर येणारे हे ग्रामीणतेचे चित्र यादवकालीन समाजाचे विशेषत: ग्रामीण-समाजाचे चित्र आपणासमोर उभे करते.

८) सारांश:

आत्तापर्यंत दृष्टांतपाठातील समाज जीवनाचे आपण अवलोकन केले. त्यावरून १३ व्या शतकातील समाजस्थितीचे स्वरूप लक्षात येण्यास मदत होते. प्राचीन काळातील लोकांचे जीवनमान, व्यवहार, सांस्कृतिक स्वरूप याचे आगळे-वेगळे चित्र त्यातून आपणास दिसते. या काळात राजा हाच समाजाचा आधारस्तंभ दिसतो. यादवकाळात यादव राजांचे राज्य होते. परंतु सामाजिक अथवा समाज जीवनाकडे या राजांचे फारसे लक्ष नव्हते. ही राजेशाही वंश-परंपरेने चालत असल्याचे आढळते. दृष्टांतपाठात ज्या दृष्टांतकथा आल्या आहेत त्यातून तत्कालीन समाजाचे विविधांगी चित्र आपणापुढे साकारलेले आहे. समाजातील चाली-रीती, सांस्कृतिक स्वरूप. होळ-व्यवसाय राज्यपध्दती इत्यादी गोष्टींची माहिती कळते. त्याचप्रमाणे सर्व सामान्यांचा समाज किती स्वाधीमणाने व चाकोरीबध्दतेने जगत होता हे ही दिसून येते. धार्मिक वृत्ती-प्रवृत्ती, त्यातून निर्माण झालेल्या श्रध्दा अंधश्रध्दा याचेही दर्शन या कथांतून घडते. स्त्रियांचे कौटुंबिक स्थान व सामाजिक दर्जा. त्यांच्यावर असलेली सांसारिक तसेच सामाजिक स्वरूपाची बंधने कळून येतात. विविध प्रकारच्या वस्तुंचा वापर करण्याचे ज्ञान या काळातील लोकांना असे होते तसेच विविध प्राणी व पक्षी देखील ते उपयोगात आणीत. या स्वरूपातून नागर जीवनाबरोबरच तत्कालीन ग्रामीण जीवनाचे दर्शनही घडते. विविध शब्दप्रयोग व भाषिक आविष्कारही या समाज जीवनाला अधिक व्यापक स्वरूप देण्यास कारणीभूत झालेला आहे. हे आवर्जुन ध्यानात घ्यावे लागते. या विवेचनामधून दृष्टांत पाठातील समाज जीवनाचे प्रभावी चित्र आपणापुढे उभे राहते.

.....

## प्रकरण चौथे

## संदर्भ सूची


१) नगरकर रा. शं. (संपा.) — दृष्टांतपाठ (प्रस्तावना) आ. १ली, पृ. ६.

२) देशपांडे वा. ना. (संपा.) — "स्मृतिस्थळ", स्मृ.क्र. १३, आ. ३री, पृ. ७.

३) देशपांडे वा.ना. (संपा.) — उनि. स्मृ. क्र. १०५, पृ. ३३.

४) देशपांडे वा.ना. — उनि, स्मृ. क्र. १०५, पृ. ३३.

५) डॉ. आवलगावकर रमेश — "केशिराज व्यास व्यक्ती आणि वाङ्.मय", आ. १ली, पृ. ४०.

६) डॉ. तुळपुळे शं.गो. — "महानुभाव पंथ आणि वाङ्.मय", आ. १ली, पृ. १८२.

७) डॉ. कोलते वि.भि. — "महानुभावपंथ आणि वाङ्.मय" (प्रस्तावना), आ.१ली, पृ. १४.

८) डॉ. आवलगावकर रमेश — उनि, पृ. ९२-९३.

९) डॉ. आवलगावकर रमेश — उनि, पृ. ९३.

१०) डॉ. पठाण यू.म. (संपा.) — दृष्टांतपाठ (परिशिष्ट), आ. १ ली, पृ. १७३.

११) डॉ. तुळपुळे शं.गो. — उनि, पृ. ८५.

१२) नगरकर रा.शं. (संपा.) — उनि, पृ. १७.

१३) डॉ. पठाण यू.म. — दृष्टांतपाठ (प्रस्तावना) आ. १ली, पृ. १२.

१४) डॉ. कुलकर्णी द.भि. — चार शोधनिबंध आ. १ली, पृ. ७.

१५) डॉ. तुळपुळे शं.गो. — महानुभाव पंथ आणि वाङ्मय आ. १ली, पृ. १८३.

१६) पानसे मु.ग. — यादवकालीन महाराष्ट्र, आ. १ली, पृ. ५८.

१७) डॉ. तुळपुळे शं.गो. — लीळाचरित्र उत्तरार्ध-२, आ. १ली, पृ. ४४-४५.

१८) पानसे मु.ग. — उनि पृ. १०६

१९) नगरकर रा.शं. (संपा.) — दृष्टांतपाठ (प्रस्तावना) आ. १ली, पृ. २०.

२०) सौ. कदळे आशा — महानुभाव विशेषांक १९४९-१९७४, पृ. ५१.

२१) सौ. कदळे आशा — उ.नि. पृ. ५२.

२२) डॉ. पठाण यू.म. — दृष्टांतपाठ (प्रस्तावना) आ. १ली, पृ. ११.

२३) बोरगावकर व.रा. — स्मृतिस्थळ एक विवेचन, आ. १ली, पृ. २७.

.......